

|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

देवधर मंडळ

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष २३ वे, अंक ४ * दि. १५ डिसेंबर २०२३ * किंमत रु. २०/-

# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

✻ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

✻ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्सप्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

✻ **कार्यवाह**

**सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

✻ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

✻ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

✻ **वाटचाल**

आशिष राम देवधर (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

✻ **सभासद**

**नारायण (दिलिप) गोविंद देवधर** (कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

✻ **सभासद**

✻ **श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५)
(स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

✻ **श्री. समीर सुरेश देवधर** (कु. वृ. पान ५८८/२२४१)
(स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

✻ **श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

✻ **कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला,
नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी,
सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

✻ **श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०)
(स्वीकृत)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

✻ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्केअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

# अध्यक्षांचे मनोगत



गेल्या तीन महिन्यात भारतातील काही महत्त्वाच्या घटना.

९/१० सप्टेंबर - जी २० शिखर परिषद राजधानी दिल्लीतील प्रगती मैदानावर संपन्न झाली.

१८ सप्टेंबर रोजी महिला आरक्षण विधेयक मांडले गेले. त्या विधेयकानुसार महिलांना लोकसभा आणि राज्यसभेत ३३ % आरक्षण देण्याचे मान्य झाले .

३ डिसेंबर रोजी मध्यप्रदेश, राजस्थान, आणि छत्तीसगड मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपला निर्विवाद बहुमत मिळाले.

तसेच गेल्या तीन महिन्यात आपण अनेक सण, उत्सव साजरे केले, त्यातील महत्त्वाचे म्हणजे गणपती, दिवाळी, दसरा.

या दीपोत्सवात आपण रोषणाई, फराळ, दिवाळी पहाट यांचा आनंद तर घेतलाच, परंतु दिवाळी अंक! मराठी साहित्यातीलच नव्हे तर मराठी संस्कृतीतील अभिमानाची गोष्ट आहे दिवाळी अंक, त्याचाही आनंद लुटला! पुढील दोन-तीन महिन्यात दिवाळी अंक वाचनाचा आनंद घेणार आहोतच. दिवाळी अंकांमुळे अनेक कवी, लेखक, साहित्यिकांना त्यांच्या प्रतिभेचा अविष्कार वाचकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळते.

देवधर मंडळासाठी विलेपार्ले आणि पुणे येथे झालेले आनंद मेळावे आपल्या कुलबंधू भगिनींसाठी आनंददायी होते. विशेष उल्लेखनीय म्हणजे या आनंद मेळाव्यामुळे अनेक कुलबंधू भगिनींच्या कर्तृत्वाचा, उद्योग व्यवसायांचा, परिचय झाला, स्नेहबंध वाढीस लागले. अशा कार्यक्रमांच्या आयोजनातून कार्यकर्त्यांना, तरुण कार्यकर्त्यांना असे मेळावे आयोजित करण्याचा अनुभव मिळतो. अनेक कलाकारांना त्यांची कला, संगीत, कविता, अनुभव, सादर करण्याची संधी मिळते. आपल्या मंडळाच्या कार्याची, अनेक योजनांची माहिती मिळते, त्यातूनच त्यांना आपले कला गुण जोपासण्याची ऊर्जा मिळते.

या मेळाव्यात विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे आपले बहुसंख्य बंधू-भगिनी उच्च विद्याविभूषित आणि आपापल्या क्षेत्रात उच्च पदावर कार्य करीत आहेत, तसेच ते आर्थिक दृष्ट्या संपन्न आहेत. या सगळ्यांचा उपयोग आपल्या गरजू आणि संकटग्रस्त बांधवांना मदत करण्यासाठी होऊ शकतो आणि आपल्या मंडळाचे उद्दिष्ट आहे , 'देवधर जितका मिळवावा' आणि 'आपण सर्वजण सुखी, समृद्ध, समर्थ आणि श्रीमंत होऊया'. हे उद्देश सफल होण्याकरता अशा मेळाव्यांचा उपयोग निश्चितच होईल.

असे आणखी काही मेळावे पुढील काळात नाशिक आणि कणकवली येथे आयोजित करण्याचा मानस आहे. या मेळाव्यालाही आपण भरभरून पाठिंबा द्याल असा विश्वास आहे .

केशवराज आपले कुलदैवत! आसूद येथे मंदिर आहे. त्याचा परिसर अतिशय प्रसन्न आहे आपल्यापैकी बरेच कुलबंधू त्याचे दर्शन वर्षातून एकदा तरी घेण्याचा प्रयत्न करतात. ही वास्तू डोंगरावर आहे आणि बऱ्याच जणांना तेथे पायी जाणे अवघड वाटते. विशेषतः ज्येष्ठ मंडळींना! आता हळूहळू तेथे जाण्यासाठी रिक्षांची सोय होऊ लागली आहे.

पुढील मजकूर पान ५ वर .....

# विलेपार्ले येथे आनंद मेळावा संपन्न

**- सौ अमिता देवधर–कुटुंबे** (गोरेगाव)

शनिवार, २८ ऑक्टोबर २०२३ कोजागिरी पौर्णिमा.

कोजागिरी पौर्णिमेच्या दुपारी उत्कर्ष मंडळ शानबाग हॉलमध्ये देवधर मंडळाचा आनंद मेळाव्याचा बॅनर लागला. हळूहळू अनेक कुटुंबं, उत्कर्ष मंडळात प्रवेश करू लागली.

प्रवेशद्वारावर अकल्पिता, अदिती, पूर्वा, मंजूषा, समीर, मनिषा नवरे स्वागतासाठी सज्ज होते. हळद कुंकू अत्तर, फुलं, पेढा देऊन स्वागत केले जात होते. गरमागरम चहा कॉफी सर्वांसाठी तयार होती.

बघता बघता हॉल, देवधर मंडळींनी भरून गेला. साडेचारच्या सुमाराला या सोहळ्याची सुरुवात झाली. पूर्वा आणि आदितीने सर्व उपस्थितांचे स्वागत करून, कार्यक्रमाची सूत्रे मनाली देवधर बेडेकर हिच्याकडे सोपविली.

या सोहळ्याची सुरुवात मंडळाचे अध्यक्ष, श्री. सुरेशजी देवधरांच्या हस्ते कुलदैवत श्री केशवराज पूजनाने झाली. केशवराजाची आरती सर्वांनी सामूहिकरित्या म्हटली.

नंतर मनालीताईने सर्वांना आवाहन केले की, प्रत्येक कुटुंबाने मंचाजवळ येऊन आपला परिचय करून द्यावा. त्याप्रमाणे रवींद्र देवधर ,दिलीप देवधर, पौरोहित्य करणारे स्वप्निल देवधर, अशा अनेक जणांनी आपला परिचय करून दिला. अमिता कुटुंबे सारख्या काही माहेरवाशीणींनी देखील आपल्या कुटुंबासोबत, या मेळाव्याला उपस्थिती लावली होती. किती वेगवेगळी व्यक्तिमत्वं त्या दिवशी पाहायला मिळाली. एकेकाचे गुणवर्णन, कौशल्य ऐकून थक्क व्हायला झाले.

परिचय सत्रामुळे सर्व कुटुंबीय एकत्र आल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होता. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे लहानांपासून ज्येष्ठापर्यंत, सर्वजण या कार्यक्रमाला उपस्थित होते.

नंतर ७५ वर्ष पूर्ण झालेल्या सदानंद, मोहन, अनिल, प्रभाकर, उषा देवधर आणि सुधा बाग या सर्वांचे शुभेच्छापत्र, फुल देऊन सत्कार करण्यात आले.

देवधर मंडळाच्या कार्यवाह सरिता देवधरांनी, शुभेच्छापत्राचे खूप छान लेखन केले आहे, ते मनालीने वाचून दाखवले. तसेच सहजीवनाची ५० वर्ष पूर्ण केलेल्या सदानंद व सुजाता तसेच प्रभाकर आणि उषा या दांपत्यांचा सत्कार करण्यात आला.

अवनी देशमुख हिला इ. दहावी मध्ये ९५ टक्के गुण मिळाल्याबद्दल, तसेच सौ. वृषाली देवधरला 'नेशन बिल्डर अवॉर्ड' मिळाल्याबद्दल कौतुक करण्यात आले. कु. दुर्वा देवधर हिचे बालकलाकार म्हणून विशेष कौतुक करण्यात आले.

कपीश देवधर ह्या बालकलाकाराने नृत्य सादर केले. अश्विनी देवधर हिने आपल्या बहारदार नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली. विविध गुणदर्शन कार्यक्रमांमध्ये, केदार देवधर याने 'शुक्रतारा मंद वारा', तर शेखर देवधर यांनी 'मोरे नैना'. सुमितने 'उठी श्रीरामा' ही भूपाळी संपूर्ण संस्कृतमधून स्पष्ट व खणखणीत आवाजात म्हटली.

सौ. शुभांगी देवधर, ठाणे यांनी कोजागिरी पौर्णिमेविषयी खास माहिती सांगितली. सौ. पौर्णिमा देवधर यांनी अंबामातेचे स्तवन केले

पुढील मजकूर पान ५ वर .....

# पुणे येथील आनंद मेळाव्यास भरघोस प्रतिसाद

- सौ. मृणालिनी श्रीकांत पंडित (पुणे)

२८ ऑक्टोबर २०२३ रोजी पार्ल्याला या वर्षीचा पहिला आनंद मेळावा दिमाखात संपन्न झाला आणि दुसऱ्या आनंद मेळाव्याचे पडघम वाजू लागले.

पटापट टीम तयार झाली.कामे वाटून घेतली गेली. मुंबईची कार्यकारिणी टीम - समीर, विष्णू, अकल्पिता, पूर्वा वहिनी आणि स्वतः अध्यक्ष श्री. सुरेश काका देवधर जातीने पुणे टीमसोबत ऑनलाईन मिटिंग मध्ये सहभागी होऊन वेळोवेळी मार्गदर्शन करत होते.

दिवसागणिक नोंदणी वाढत होती आणि त्याचबरोबर सर्वांचा हुरूप सुद्धा.

अखेर तो दिवस उजाडला. दि. २५ नोव्हेंबर २०२३. दुपारी ३.३० वाजताच, मिलिंद, स्नेहल आणि ऋत्वासह दाखल झाला. पाठोपाठ मृणाल, मधुरा, महेंद्र आणि मंजिरी, सुनील, गीतांजली दाखल झाले. कार्यक्रमाची लगबग सुरू झाली. फोन खणखणू लागले.

सौ, मंजिरी महेंद्र देवधर यांनी बाहेर सुरेख फुलांची रांगोळी घातली होती.

एव्हाना मुंबई कार्यकारिणी टीम अर्थात अकल्पिता, समीर, विष्णू, मंजूषा हजर झाले. त्यांच्या पाठोपाठ अध्यक्ष सुरेशकाका, सुगंधाकाकू, कार्यवाह सरिताकाकू आणि उपाध्यक्ष पी.जी.काका यांचे आगमन झाले.

देवधर मंडळींचे आगमन व्हायला सुरुवात झाली होती. काही मुले आपल्या पालकांसोबत आली होती. तर काही पालक आपल्या मुलांसोबत आले होते. असा ३ पिढ्यांचा अनोखा संगम इथे दिसत होता.

समीर , मंजूषा आणि अकल्पिता यांनी नाव नोंदणीला सुरुवात केली.

सौ. मधुरा कर्वे (पूर्वाश्रमीची भावगंधा देवधर) हिने तिच्या खास शैलीत सूत्रसंचालन सुरू केले.

सर्वप्रथम गुरुवंदना करून दीप प्रज्ज्वलन करण्यासाठी अध्यक्ष सुरेश काका, सौ. सुगंधा काकू, कार्यवाह सरिता काकू,आणि उपाध्यक्ष पी.जी. काका यांना आमंत्रित करण्यात आले.

सुनील देवधर आणि सर्व देवधर मंडळींनी अतिशय तन्मयतेने आरती केली.

त्यानंतर दिवंगत देवधर मंडळीना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## परस्पर परिचयाचा कार्यक्रम

उपस्थित प्रत्येक कुटुंब आपापला कुटुंब परिचय देत होते.

कोणी उत्तम कलाकार, कोणी उच्चपदस्थ अधिकारी, कोणाचा स्वतःचा व्यवसाय, थोडक्यात देवधर मंडळी सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत हे लक्षात येत होते. देवधर मंडळींना लक्ष्मी आणि सरस्वती दोहोंचाही वरदहस्त लाभलेला आहे हे समजत होते.

आज सौ सुगंधा काकूंचा वाढदिवस. सर्वांनी काकूंना खूप खूप शुभेच्छा दिल्या. सुरेशकाकांकडून छान बिस्कीटकेक सर्वांना देण्यात आला. .

सौ. मधुराने पुढील कार्यक्रमाची सूत्रे सौ. मृणालिनी श्रीकांत पंडित (पूर्वाश्रमीची सुरेखा कृष्णा दीक्षित) हिच्याकडे पोहोचविली.

मृणालने कार्यक्रमाची सुरुवात फनी गेम्सनी केली. खुमासदार शैलीत प्रेक्षकांशी संवाद साधत

राऊंड सुरू झाले. या फनी गेम्ससाठी जी बक्षिसे ठेवली होती, त्याचे प्रायोजकत्व कार्यवाह सरिता काकूंनी घेतले होते.

पहिल्या राऊंडचे विजेते ठरले, श्री. अजय ढमढेरे. तर दुसरे विजेते होते श्री. शिरीष देवधर. तिसऱ्या राऊंडला आणखीनच धमाल आली.

कारण १० जण विजेते झाले. आता बक्षीस कोणाला मिळणार याची उत्सुकता होती.

सौ. सुगंधाकाकू यांच्या हस्ते 'लकी ड्रॉ' काढला गेला. आणि तिसऱ्या राऊंडमध्ये विजेत्या ठरल्या प्रज्ञा साठे.

विजेत्यांना, कार्यवाह सरितकाकू, अध्यक्ष श्री. सुरेशकाका आणि सौ. सुगंधाकाकू यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

यानंतर मृणालने पुढच्या कार्यक्रमाला सुरुवात केली, तो म्हणजे सत्कार समारंभ. अर्थात कौतुक सोहळा.

या वेळी अमृत महोत्सवी सत्कार मूर्ती होते, श्री. माधव देवधर, वैजयंती देवधर, श्री. वसंत नारायण देवधर, डॉ. यशवंत विनायक देवधर, सुनीता अरविंद देवधर आणि शुभदा मुकुंद देवधर.

त्यानंतर विवाहाला ५० वर्षे झालेल्या जोडप्यांचे सुवर्णमहोत्सवी सत्कार झाले. सत्कार मूर्ती होते, माधव आणि वैजयंती देवधर, वसंत आणि सुप्रिया देवधर तसेच धनंजय आणि सुनीता देवधर.

अमृत महोत्सवी आणि सुवर्ण महोत्सवी शुभेच्छापत्रांचे वाचन झाले. ती लिहिली आहेत, मंडळाच्या कार्यवाह सरिता देवधर यांनी.

नंतर गुणवंतांचा सत्कार झाला.

सत्कार मूर्ती होते, निहरिका शिरीष पाठक आणि आल्हाद कौस्तुभ देवधर. या दोघांनाही १२ वी मध्ये ८६% मार्क्स मिळाले.

सुनील देवधर यांनी अमृत महोत्सवी साठी,तर मिलिंद देवधर यांनी विवाहाला ५० वर्षे पूर्ण झालेल्या सुवर्ण महोत्सवी सत्कारासाठीचे शुभेच्छा संदेश वाचले.

मधुराने पुन्हा कार्यक्रमाची सूत्रे आपल्याकडे घेतली.

मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेशकाका देवधर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सर्व टीमचे छान फुले देऊन कौतुक केले.

त्यानंतरचा कार्यक्रम म्हणजे विविध गुण दर्शन. आपली देवधर मंडळी या क्षेत्रातही प्रवीण आहेत.

सुरुवातीला सुलभा प्रकाश जोशी यांनी आपल्या कवितेतून सर्वांना चारधाम यात्रा घडवून आणली.

त्यानंतर आले श्री. अजय ढमढेरे. त्यांच्या माउथ ऑर्गनने तर सर्वांना गाण्याच्या दुनियेत नेले.

त्यानंतर आला छोटा कपिल देवधर. त्याने आपल्या खणखणीत आवाजात शिवाजी महाराजांसाठीचे एक छान गाणे सादर केले.

'अच्युतम केशवम'च्या तालावर छोट्या आर्या ढमढेरेने सुरेख नृत्य सादर केले. एका पेक्षा एक सर्वांचेच सादरीकरण झकास होत होते.

गोपाळ देवधर यांनी 'शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती' हे गाणे सादर केले.

अनिल ढमढेरे (मूळ इंदोर) यांनी देवधर मंडळावर कविता केली होती. तर दुसरे अनिल ढमढेरे (नागपूर) यांनी फुलोंके रंग से..हे बहारदार गीत सादर केले.

मंजिरी देवधर यांचे, वारा गाई गाणे आणि मनाली देवधर यांचे, नभ उतरू आलं ही गाणी झाली.

भावगंधा उर्फ मधुरा हिने तिची स्वरचित कविता सादर केली. (त्या कवितेला कल्याण इथल्या एका राज्यस्तरीय कार्यक्रमात पहिल्या क्रमांकाचे

बक्षीस मिळाले आहे.)

वर्षा देवधर ने सादर केलेल्या सासूबाईंच्या आरतीला सर्वांची दाद मिळाली.

मृणाल पंडित हिच्या आईने (सौ. शैलजा कृष्णा दीक्षित, कणकवली) तिचे स्वरचित गाणे पाठवले होते. त्या गाण्यात श्री केशवराजाचे वर्णन केले होते. त्या गाण्याची ऑडियो क्लिप सादर केली.

अनघा ढमढेरे यांनी स्वरचित कविता सादर केल्या, तर सुनीता देवधर यांनी अभंग सादर केला..

जेवणाची वेळ झाली होती. पण देवधर मंडळी सादरीकरण पाहण्यात आणि कलाकारांचे कौतुक करण्यात गुंग झाली होती. एक एक करत सर्वांचे झकास परफॉर्मन्स झाले.

त्यानंतर मिलिंद देवधरने नेटक्या शब्दात आभार प्रदर्शन केले. सुनील देवधरच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सुग्रास भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला.

पुलाव, रगडा पॅटीस, मसाला डोसा, चटणी, सांबार आणि दुधीहलवा असा झकास बेत होता.

जेवणानंतर एकमेकांची भेट घेत सर्वांनी निरोप घेतला.

***

...... पान २ वरून

सौ. अमिता कुटुंबे यांनी एक पिकनिक सॉंग गाऊन वातावरण हलके फुलके केले .

श्री. रत्नाकर तारदाळकर या देवधरांच्या जावईबापूंनी स्वतःच्या 'आवाज कारकिर्दीतले' विविध अनुभव कथन केले. सुगंधाताईंनी छान गोष्ट सांगितली .

आदितीने थोडक्यात आभार प्रदर्शन केले.

नंतर पसायदान आटोपताच, सर्वांनी आपला मोर्चा जेवणाकडे वळवला. मोजकेच; पण गरमागरम, चविष्ट पदार्थांमुळे सर्वांची रसना तृप्त झाली. विष्णू देवधरांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग तर सुंदरच. पूर्वाने मसाला दुधाचा आस्वाद घेतल्याशिवाय, कोणीही जायचे नाही असा प्रेमळ आग्रह केला .

मसाला दुधाची चव जिभेवर रेंगाळत असतानाच, ''पुन्हा भेटू या, ओळख जपू या''असा निरोप घेत सर्वजण निघाले. एकंदरीत हा आनंद सोहळा उत्साहात, आनंदात, दिमाखात संपन्न झाला.

***

...... पान १ वरून

या मंदिराचा जीर्णोद्धार करून तेथे एक सुंदर आणि भव्य मंदिर उभारण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली आहे. केशवराज हे अनेक चित्तपावनांचे कुलदैवत आहे, त्यामुळे मंदिराच्या जीर्णोद्धाराचा प्रकल्प हाती घेतल्यास त्यासाठी लागणारा निधी सहज उपलब्ध होऊ शकतो. आवश्यकता आहे ती तरुण मंडळींनी पुढाकार घेऊन, तो प्रकल्प हाती घेऊन तडीस नेण्याची! माझे आपल्या कुलबांधवांना, विशेषत: तरुण मंडळींना आग्रहाची विनंती आहे की याचा जरूर सकारात्मकतेने विचार करावा आणि आवश्यक ती कार्यवाही करावी .

लवकरच २०२४ साल सुरू होईल. ते वर्ष आणि आगामी काळ आपणा सर्वांना निरामय आरोग्याचा सुख समृद्धीचा जावा यासाठी केशवराजाचरणी प्रार्थना !

शुभम भवतु!!

***

# नाशिक आनंद मेळावा व तीळगूळ समारंभ

नमस्कार मंडळी. नाशिक आनंद मेळावा हे वाचून सगळ्यांना गंमत वाटली असेलच. आपण आतापर्यंत दोन आनंद मेळावे पूर्णपणे यशस्वी केले. एक झाला तो मुंबईला आणि दुसरा झाला तो पुण्याला. आता नाशिकलाही आनंद मेळाव्याचं छानसं आयोजन केलेल आहे. आपण सगळे एकत्र भेटणं आपल्या परस्परांमध्ये आपुलकी निर्माण होणे. आपल्या मधले जिव्हाळ्याचे बंध दृढ होणं या सगळ्यासाठी आपण सगळ्यांनी सतत भेटत राहणं नक्कीच गरजेचे आहे.

नाशिक सारखं सुंदर ठिकाण, जिथे आध्यात्मिक वारशापासून यंत्र युगाकडे जाणाऱ्या पाऊलखुणा या नाशिक शहराने जपल्या आहेत. सुंदर नाशिक, ग्रेप सिटी नाशिक, धुक्याची चादर पांघरलेल नाशिक अशा ठिकाणी या आनंद मेळाव्याचं आयोजन केलेल आहे. तरी आपण समस्त देवधर मंडळींनी नक्की नाशिकला येण्याचं आवर्जून ठरवावं आणि नाशिकच्या आनंद मेळाव्यामध्ये पुन्हा एकदा नवीन ऊर्जा मिळवून आपल्या आयुष्यासाठी आनंदाचे क्षण वेचू या. अगदी बकुळीची सुंदर फुले वेचावी असे!

आपण सगळ्यांनी नाशिकमध्ये नक्कीच या. आपली उपस्थिती ३१ डिसेंबर पर्यंत पैसे भरून निश्चित करा. ते नियोजनासाठी सोपे होईल.

अध्यक्ष, देवधर मंडळ

संमेलनाची तारीख -
रविवार, दि. २८. जानेवारी २०२४
स्थळ- कालिकामाता मंदिर हॉल, जुना आग्रा रोड, नाशिक
वेळ - सकाळी ९.०० ते दुपारी ४.००

संमेलन शुल्क - रुपये ३५०/-
शुल्क - google pay /paytm वर करावे
मोबाईल : ९८३४३५४२४७
प्रशांत देवधर (नाशिक)

अधिक माहितीसाठी संपर्क -
शुभांगी देवधर (९८९०२४०५२२)
संजय देवधर (९४२२२७२७५५)

# देवधर मंडळ – एकूण व हयात सभासद संख्या

* दि. ३०/३/२०२३ च्या वार्षिक हिशोब पत्रकांच्या क्र. १ परिशिष्ठानुसार नोंदविलेल्या एकूण आजीव सभासदांची संख्या २७८६
* दि. १५/१२/२०२३ मंडळाच्या स्थापनेपासून कार्यकारी मंडळांना वेळोवेळी मिळालेल्या माहितीनुसार व दि. १/१०/१९८९ ते १५/१२/२०२३ दरम्यान त्रैमासिक वाटचाल मधील आपण यांना अंतरलो इ. शोकवृत्तानुसार मयत आजीव सभासदांची संख्या - ५७९
* एकूण हयात संख्या - २२०७

टीप : ही आकडेवारी मंडळास उपलब्ध माहितीवर आधारित आहे. अर्थात ज्या इतर मयत आजीव सभासदांची तारखेसह संपूर्ण माहिती त्यांच्या नातेवाईकांकडून मिळाल्यावरच साधारणपणे ही हयात संख्या कायम समजता येईल अशी अटकळ आहे. तरी संबंधितांनी लेखी संपूर्ण माहिती द्यावी.

- **वा. ना. देवधर**, जोगेश्वरी ९८२०१३४०८०

# वाटचाल वितारणासंबंधी निवेदन

नमस्कार कुलबंधू/ भगिनींनो,

१५ डिसेंबर २०२२ च्या वाटचालच्या त्रैमासिकात सहकार्यवाह सौ. पूर्वा प्रमोद देवधर यांनी आपणांस आपला अंक व्हॉट्सअॅप अथवा ई-मेलने हवा असल्यास तसे, पूर्ण माहितीसह कळविण्याचे कळकळीचे आवाहन केलेले आहे, ते आपण सर्वांनी वाचले असावे असे गृहित धरतो.

मी, नरेश कृष्णाजी दीक्षित, रा. डोंबिवली, वाटचालच्या अंकांच्या पत्त्यांसदर्भात काम करतो. आपल्याकडे येणारा वाटचालचा अंक बरोबर येतो कां, तसेच आपला पत्ता बदलला असेल तर नवीन पत्ता बदल करणे, नवीन सभासदांना स्वतंत्र किंवा कुटुंबात जोडून अंक पाठविण्यासाठी कार्यरत असतो, याची आपणास कल्पना असेलच. वाटचालचे अंक परत आल्यावर, ते परत कां आले असावे याचा धांडोळा नातेवाईकांचे फोन/ मोबाईल नंबर असतील तर घेणे शक्य होते. परंतु अनेकदा असे लक्षात येते की त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचे सुद्धा फोन नंबर नसतात. मग तो अंक बंद करणे इष्ट ठरते. परंतु गंमत म्हणजे अशा सभासदांकडून आमचा अंक बंद कां झाला अशी साधी विचारणा सुद्धा होत नांही. मग प्रश्न पडतो की खरंच तो अंक तुम्हाला नको आहे कां? म्हणून विनंती की आपल्याला अंक नको असल्यास आपण तसे कळवू शकता, त्याबद्दलही आपल्या सहकार्याचे स्वागत होईल.

ज्या सभासदाच्या नावाने वाटचाल अंक घरी पोहोचतो त्याचे निधन झाल्यावर तो अंक ६ महिने तसाच चालू ठेवू. म्हणजे पुढील दोन वाटचाल त्या पत्त्यावर जातील

त्यादरम्यान संबंधित कुटुंबीयांनी तो अंक पुढे पाठवायचा की नाही ते मला स्पष्ट शब्दात कळवावे. अर्थातच संबंधित कुटुंबीय मंडळाचा आजीव सभासद असणे आवश्यक आहे.

**दुसरी एक विनंती की, जर आपल्या पत्त्यावर आपला मोबाईल क्रमांक लिहिलेला नसेल तर तो ताबडतोब मला कळवावा. अन्यथा सदरचा अंक आपणापर्यंत पोचतच नांही/ नसावा असे गृहित धरून आपला अंक थांबविण्यासाठी मंडळाला विचार करावा लागेल.**

पुणे/ मुंबई येथे अनेक कार्यक्रम होत असूनही, नवनवीन कुलबंधू येतच नाहीत, त्यामुळे त्यांचे संपर्क क्रमांक मिळविणे हे सोपे कामही करता येत नाही. तरी विनंती की, आपण वाटचालचा अंक मिळत असून वाचत असाल तर, वरती केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी माहिती माझे मोबाईल नंबर वर फक्त मेसेज/ SMS च्या रूपात पाठवावी. यामध्ये आपल्या नावात आपल्या वडिलांचे नाव लिहिण्यास विसरू नये. सभासद क्रमांक, पान नंबर कळवावा. अथवा श्री. आशिष देवधर यांच्याकडे (मोबाईल : ७०४५३५३६०२) व्हॉट्स अॅप वर कळवावे. अंक हवा असेल तर पूर्ण पत्ता सुद्धा कळवावा.

वाटचालच्या माध्यमातून आपण सर्व कुलबंधू-भगिनी एकमेकांच्या संपर्कात राहतो. त्यामुळे वाटचाल सर्वांपर्यंत यशस्वीपणे पोहोचावा हेच मंडळाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आपणाकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

माझे नाव व मोबाईल नंबर - नरेश कृष्णाजी दीक्षित. ९८२०४६७७४२.

***

## नवीन सदर

# यशस्वीतांचा परिचय

आपल्या देवधर - दीक्षित - ढमढेरे कुलबंधू-भगिनींमध्ये अशा अनेक व्यक्ती आहेत, ज्या नेहमीची ठरलेली घर आणि ऑफिस एवढाच दिनक्रम न स्वीकारता किंवा त्यात राहूनही काही वेगळ्या वाटा निवडून, समजोपयोगी काम करून यशस्वी व्यक्ती म्हणून पुढे आल्या आहेत. अशा व्यक्तिंचा परिचय आपणा सर्वांना करून देणे हा या सदरमागील उद्देश आहे. आपणही आपल्या परिचित असलेल्या अशा यशस्वी देवधर व्यक्तिंची माहिती या सदरकरिता पाठवावी ही विनंती.

# सौ. भुवनेश्वरी उत्कर्ष ढमढेरे

मोबाईल नंबर : ९२८४४०३६६०
ishadhamdhere222gmail.com

सौ. भुवनेश्वरी ढमढेरे यांचे गेली वीस वर्षे पुण्यात वास्तव्य आहे.

त्यांचे शिक्षण : Post graduate from Ness Wadia College

Reiki Grandmaster

24 types of healing Master

vastu parikshan वास्तु विशारद, शापित वास्तू तज्ज्ञ असे आहे.



सामाजिक क्षेत्रांमध्ये त्या

✻ युनिव्हर्सल ह्यूमन राईट्स काऊन्सिल, भारत - पुणे शहराध्यक्ष

व पुणे जिल्हा महासचिव पदावर कार्यरत.

Anti corruption Pune coordinator.

गोसेवक, गोरक्षक अशा विविध पदांवर कार्यरत आहे.

त्यांच्या घरातील कौटुंबिक वातावरण अतिशय खेळीमेळीचे होते.

त्यांचे वडील सुप्रसिद्ध Advocate, तर आई Naturopathy Doctor, होमिओपॅथी डॉक्टर

घरातून सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक वारसा लाभला. आईने अनेक जणांना मोफत औषधे दिली, अनेक सामाजिक विषयांवर नाटके लिहून बसवली.

पु. ल. देशपांडे, रत्नाकर मतकरी यांच्याबरोबर त्यांच्या आई वडिलांच्या अनेक साहित्यिक magestic गप्पा होत. अनेक वेळा पत्र व्यवहार झाले. त्याचा उपयोग सौ. भुवनेश्वरी यांना पुढील काळात झाला.

सौ. भुवनेश्वरी यांना मिळालेली पारितोषिके. : -

✻ राज्यस्तरीय नारी गौरव समाज रत्न पुरस्कार

✻ पुणे महानगरपालिका समाज विकास पुरस्कार.

* सन सिटी पोलीस स्टेशन सिंहगड रोड येथे महिला दिनानिमित्त सत्कार.
* अनेक सामाजिक संस्था शाळा, कॉलेजमधून विविध पुरस्कार.

युनिव्हर्सल ह्यूमन राईट्स काऊन्सिल अंतर्गत पुणे शहर अध्यक्ष तसेच पुणे जिल्हा महासचिव या नात्याने त्या अनेक उपक्रम राबवत आहे. ज्यांच्यावर अन्याय झालाय त्यांना न्याय मिळवून देत आहे. पुणे जिल्ह्यातील अनेक केसेस वर काम करत आहे.

भ्रष्टाचार, स्त्रीभ्रूणहत्या, बाल मजुरी, बालविवाह, महिलांवर होणारे अत्याचार, पीडित व्यक्तिंना सहकार्य, प्रदूषण निर्मूलन, ट्रॅफिक रुल्स पालन समाज प्रबोधन, पोलिस प्रशासनाला सहकार्य करणे, खाद्य पदार्थातील भेसळ यांच्यावर कारवाई करणे, एड्स जनजागृती, असहाय्य लोकांना मदत करणे, पर्यावरण संरक्षण ,सर्वसामान्य लोकांच्या अधिकाराबद्दल जाणीव करून देणे ,सरकारी योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे अशा स्वरूपाची विविध समाचोपयोगी कार्य त्या करीत असतात.

कॉलेज जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अनेक विद्यार्थी संघटनांबरोबर त्यांनी काम केले. तीन वर्षे विद्यार्थी परिषद मंत्री म्हणून काम बघितले. त्याअंतर्गत अनेक उपक्रम राबवले, भाजप युवा मोर्चा प्रमुख म्हणून काम बघितले, निर्मल कला अकादमी या संस्थेत काम केले. अनेक नाटके, लोकनाट्य ,पथनाट्य ,सामाजिक विषयांवर लेखन दिग्दर्शन केले, ती गावोगावी जाऊन सादर केली. एकांकिकेला तीन वेळा नॅशनल अवॉर्ड मिळाले. अनेक स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून मला आमंत्रित करण्यात आले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विशेषत: ज्ञानेश्वरी, दासबोध यावर निरूपण ही त्या करतात.

सध्या अनेक सामाजिक उपक्रम राबवत आहे.

''जन्मापासून आपल्या डोक्यावर समाजाचे ऋण असते तसेच निसर्गाचे हे खूप मोठे ऋण असते ते याच जन्मी फेडायचे ही शिकवण आई-वडिलांकडून मिळाली. आपल्या कमाईतील काही भाग व वेळ समाजकार्यासाठी नेहमी द्यावा. यातूनच प्रेरणा घेतली'' असे त्या आवर्जून सांगतात.

## सौ. भुवनेश्वरी ढमढेरे यांनी राबवलेले विविध उपक्रम त्यांच्याच शब्दांत

मी, प्लास्टिक रिसायकलिंग यासाठी कार्यशाळा घेतल्या. झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन लहान मुलांसाठी अनेक उपक्रम राबवले. गरवारे बालभवन येथे लहान मुलांकडून अनेक उपक्रम करवून घेतले. सामाजिक विषयावर नाटके लिहून ती सोसायट्यांमधून गणेशोत्सवात सादर केली. मुलांना चांगल्या सवयी लागाव्यात म्हणून अनेक बालनाट्यं लिहिली. लहान बाळांसाठी बडबड गीते तयार केली. मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी पोलिसांना तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी महिला पोलिसांना महिला दिनाच्या दिवशी मार्गदर्शन केले, शाळा व महाविद्यालइन मुलांना मार्गदर्शन केले, अथर्व कोचिंग क्लासेस चाटे कोचिंग क्लासेसमध्ये परीक्षेचा ताण कसा कमी करता येईल यावर मार्गदर्शन केले.पालकांना मुलांचे संगोपन या विषयावर मार्गदर्शन केले,

Japanese original reiki grandmaster ship मिळवली.

गेले सतरा वर्ष अनेक हॉस्पिटल्समध्ये healing देत आहे. २४ प्रकारच्या healing che healing and training centre आहे. online

training, distance healing, देश-परदेशात देते, वास्तु परीक्षण वास्तु healing, भूमी परीक्षण करते. ऑपरेशनच्या वेळेस हॉस्पिटलमध्ये जाऊन healing देते, अनेक खर्ली पेशंटला मोफत healing दिले, लहान मुलांना मोफत healing शिकवत आहे ज्यामुळे अनुवंशिक रोग त्यांना होणार नाही, अभ्यासातली एकाग्रता वाढावी, रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी.

फेसबुकवर मेडिटेशन नवीन ग्रुप तयार करून त्या ग्रुप अंतर्गत लोकांकडून मेडिटेशन करून योगनिद्रा healing कसे द्यावे याचे मोफत सेमिनार घेतले. Lockdown मध्ये अनेकांचे व्यवसाय बंद पडले, नोकऱ्या गेल्या, या सर्वांसाठी फेसबुक वर नवीन ग्रुप तयार केला. नोकरी मिळण्यासाठी व व्यवसाय वाढण्यासाठी त्याचा त्यांना खूप फायदा झाला.

पद्मजा फौंडेशनची स्थापना करून त्या अंतर्गत अनेक आध्यात्मिक उपक्रम राबवित आहे.

आपली भाषा आपली संस्कृती याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. परदेशात संस्कृत बऱ्याच देशांमध्ये कंपल्सरी केले आहे येणाऱ्या काळात संस्कृतला खूप महत्त्व येणार आहे त्यासाठीच लहान मुलांना संस्कृत शिकवत आहे. त्याअंतर्गत गीता अर्थासहित मोफत शिकविणे चालू आहे, अनेक स्तोत्र, ग्रंथ अर्थासहित शिकविणार आहे .

पर्यावरणातील नुकसान टाळणे, पशुपक्षी प्राणी यांची काळजी घेणे यासाठी सामाजिक अनेक उपक्रम राबवत आहे.

बऱ्याच जणांना डिप्रेशनमधून बाहेर काढले.

मानसिक शांततेसाठी कठीण परिस्थितीला धीराने तोंड देणे, लग्नानंतर पती-पत्नीमधील वाद, आत्महत्येचे विचार, करिअर घडत नाही म्हणून मनामध्ये भीती, आत्महत्येचे विचार, depression, व्यसनमुक्ती, कौटुंबिक वाद विवाद, गंभीर आजार त्यामुळे येणारा मानसिक ताण या व अशा अनेक विषयांवर समुपदेशन करून अनेकांना नवजीवन दिले आहे.

स्पेशल चाईल्ड, अंध मुले, डिफेन्स आर्मी ऑफिसर्स, सायंटिस्ट त्यांना व त्यांच्या कुटुंबांना reiki healing दिले . त्यांना पूर्ण बरे केले.

ढमढेरे हे आडनाव ब्राह्मणी नाही असा बऱ्याच जणांचा गैरसमज आहे. ब्राह्मण समाजाला मिळणारी वागणूक बघून मन खिन्न होते. आपल्या समाजाला सहज कोणतीच गोष्ट मिळणार नाही का? अनेक समस्या आहेत, त्या सोडवायची गरज आहे. त्याकरिता आपल्यामध्ये एकी हवी. मी, अखिल भारतीय ब्राह्मण संघाचेही काम करत आहे. देवधर परिवाराबद्दल महेश देवधर यांच्या कडून समजले आणि मी आपल्या लोकांशी जोडले गेले. आपल्या सर्वांचे आशीर्वाद माझ्याबरोबर आहेतच.

आजवर मी अनेक वर्षे सामाजिक कार्य केले, अनेक पुरस्कारही मिळाले. सन सिटी रोड सिंहगड रोड येथे महिला दिनाच्या दिवशी सत्कार झाला. बाहेर कितीही हार तुरे मिळाले तरी या सगळ्यात मोलाची घरच्यांची आपल्या माणसांची शाब्बासकीची थाप खूप मौल्यवान असते.

ही सर्व कामगिरी पार पाडत असताना अनेक कौटुंबिक समस्या उद्भवल्या. कुटुंबाला, कुटुंबातील लोकांना कायम सर्वप्रथम प्राधान्य दिले. ते कधी नाराज होणार नाहीत याची काळजी घेत सामाजिक जबाबदारी स्वीकारली.

कितीही दमलो, कितीही थकलो तरी सामाजिक काम केल्यानंतर मिळणारा आनंद हा

पुढील मजकूर पान ११ वर .....

# डॉ. स्मिता आठवले देवधर



पुणे येथील आपल्या एक उच्चविद्याविभूषित कुलभगिनी.

त्यांचा जन्म जानेवारी १९६९ मध्ये पुणे येथे झाला. शालेय शिक्षण मात्र बालमोहन विद्यामंदिर दादर येथे झाले त्यापुढे त्यांना बारावी उत्तीर्ण झाल्यावर BDS साठी मुंबईच्या नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेज येथे प्रवेश मिळाला. तेथेच त्यांनी MDS (Prosthodontics) ही पूर्ण केले.

पोस्ट ग्रॅज्युएशन केल्यावर त्यांनी नायर हॉस्पिटल डेंटल कॉलेज येथे काही काळ लेक्चरर म्हणून काम केले.

नंतर पुन्हा परत पुणे येथे वास्तव्यास आल्यावर त्यांनी जवळजवळ २२ वर्षे Dentistry मध्ये अध्यापन केले. पुण्याच्या डी. वाय. पाटील डेंटल कॉलेजमध्ये त्यांनी Professor, PG & PhD teacher in Prosthodontics म्हणून विद्यार्थ्यांना विद्यादान केले.

मध्यंतरीच्या काळात १९९८ पासून त्यांनी पुणे येथे हे स्वतःचे क्लिनिक सुरू केले होते. त्यामुळे कार्य बाहुल्यामुळे त्यांनी अध्यापन करणे थांबविले. नोव्हेंबर २०२३ मध्ये त्यांच्या क्लिनिकला २५ वर्षे पूर्ण झालेली आहेत.

सन २००१ पासून त्या पुण्यातील सुप्रसिद्ध दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथे कन्सल्टंट म्हणून कार्यरत आहेत.

''कुठलेही काम करताना त्यात चिकाटी सातत्य व्यावसायिक निष्ठा सचोटी सामाजिक जबाबदारीचे भान आणि गुणीजनांची मैत्री हे त्या त्या यशस्वीतेचे मुख्य गमक आहे'' असे डॉक्टर स्मिता यांचे मानणे आहे.

त्यांचे पती डॉक्टर अविनाश कमलाकर देवधर हेही वैद्यकीय व्यवसायातच कार्यरत असून त्यांची मुलगी कुमारी मुक्ता हिने University of Birmingham, UK येथून MSc - Hydrogeology पूर्ण केलेले आहे. सध्या ती बंगलोर येथे Well Labs मध्ये नोकरी करीत आहे.

***

.......पान १० वरून

काही विलक्षण असतो.

सामाजिक काम करत असताना महिलांना अनेक घरगुती अडचणींना तोंड द्यावे लागते. कुठलीही चांगली सुरुवात एकटीनेच करावी लागते. सर्वप्रथम आपले ध्येय निश्चित करावे. त्या मार्गाने चालत राहवे. अनेक अडचणी येतच राहणार आहेत. त्यावर मात करून पुढे जाण्याचा आनंद काही वेगळाच असतो. मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करता आले पाहिजे. त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. या समाजाप्रती, निसर्गाप्रती आपण काहीतरी देणे लागतो. ते याच जन्मी फेडायचे असा दृढ संकल्प करून वाटचाल करुया. आपण सर्व सामाजिक कार्यात खारीचा वाटा नक्कीच उचलू शकतो आणि तो करण्याचे मनापासून ठरवू या.

***

# डॉ. सुगंधा सुरेश देवधर



मी डॉक्टर सुगंधा सुरेश देवधर. पूर्वाश्रमीची कल्पना शिवराम दांडेकर. माझा जन्म हर्णे मुरुड या गावी, माझ्या आजोळी, २५ नोव्हेंबर १९५० रोजी झाला. तसं दांडेकरांचं गाव, म्हणजे माझे माहेर, दाभोळ खाडीतील एका डोंगरात बसलेले गुडघे हे खेडेगाव.

माझे आई-वडील दोघेही पेशाने शिक्षक. त्यांचे वास्तव्य दापोली या तालुक्याच्या गावी. त्यामुळे माझे शिक्षण दापोलीतच झाले. शाळेचे नाव अल्फ्रेड गॅडनी हायस्कूल.

योगायोग असा की माझे जन्मगाव 'मुरुड' हे भारतरत्न महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचे गाव, तर माहेरचे 'गुडघे ' हे गाव प्रसिद्ध साहित्यिक स्वर्गीय गो .नी. दांडेकर यांचे मूळ गाव! आमची शाळाही A. G. High School ही रत्नागिरी जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा म्हणून प्रसिद्ध! साने गुरुजी, रँगलर परांजपे, भारतरत्न पां. वा. काणे अशा महनीय व्यक्ती आमच्या शाळेच्या विद्यार्थी होत्या.

१९६७ साली मेरिट लिस्टमध्ये दहावा नंबर मिळवून मी एस.एस.सी. झाले. गणितात १००/१०० मार्क मिळाले. नॅशनल मेरिट स्कॉलरशिपही मिळाली. लहानपणापासूनच डॉक्टर व्हायचे असे ठरवले होते.

१९७३ मध्ये गव्हर्नमेंट डेंटल कॉलेज, मुंबई येथून बी.डी.एस. ही पदवी घेतली.

१९७४ मध्ये लग्न झाले श्री. सुरेश विश्वनाथ देवधर हे माझे पती.

जी.डी.सी. मध्ये एक वर्ष अनुभव घेण्यासाठी काम करून १९७५ मध्ये बोरिवली येथे घरातच स्वतःचे डेंटल क्लिनिक सुरू केले. कालांतराने घरासमोरच दुसरा फ्लॅट घेऊन क्लिनिक तेथे हलवले. चाळीस वर्षे यशस्वीपणे व्यवसाय करून आता मी व्यवसायातून निवृत्त झाले आहे.

पती श्री. सुरेश विश्वनाथ देवधर, C.A. ते टाटा मोटर्समध्ये कार्यरत होते. आता निवृत्त होऊन देवधर मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, आणि इतर काही सामाजिक संस्थांच्या कामामध्ये व्यस्त असतात. आमचे दोन सुपुत्र. मोठा पराग सुरेश देवधर. तो सुद्धा सीए आहे तो बंगलोर येथे स्थायिक आहे. त्याची पत्नी शिल्या, आणि कन्या अदिती.

दुसरा अक्षय सुरेश देवधर, तो इंजिनियर आहे आणि ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन येथे वास्तव्य आहे. त्याची पत्नी शलाका आणि कन्या रिया.

माझे श्वशुर विश्वनाथ शंकर देवधर. सर्व देवधर मंडळी अजूनही त्यांना वि.शं. या नावानेच ओळखतात. ते देवधर मंडळाच्या सुरुवातीपासूनच मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते! माझ्या सासुबाई सौ.सुनंदा विश्वनाथ देवधर, यांची त्यांना मोलाची साथ होती. मंडळाचे काम करणारे त्यांचे सहकारी नेहमीच घरी येत असत. आम्ही त्यांच्याबरोबरच राहात असल्यामुळे सासूबाईंच्या अगत्यशीलतेचे संस्कार माझ्यावर सुरुवातीपासूनच झाले. देवधर

मंडळाशी परिचय तेव्हापासूनच झाला. मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि संक्रांत सम्मेलन अशा कार्यक्रमास आम्ही मुलांसह नियमित हजेरी लावत होतो. आमच्याकडून जमेल तेवढा मंडळाच्या कार्यातील खारीचा वाटाही उचलत होतो आणि आता श्री. सुरेश देवधर हे निवृत्ती स्वीकारल्यापासूनच देवधर मंडळाच्या कार्यकारी मंडळात आहेत आणि सध्या तर ते मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे देवधर मंडळाशी पहिल्यापासून असलेले नाते अधिकच दृढ होत गेले आहे. मंडळाच्या सर्व उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष सहभाग नेहमीच असतो त्यामुळे आनंदही वाटतो.

आता माझ्या व्यवसायाविषयी :- डेंटल क्लिनिक सुरू करताना घर आणि व्यवसाय यामध्ये समतोल राखायचा हे मनाशी ठरवलेलं होतं. त्याप्रमाणे दवाखाना घरासमोरच होता.

घरात वयस्कर सासूबाई - सासरे, मुले लहान, आणि पतीराजांची फिरतीची नोकरी. घर आणि दवाखाना जवळच असल्यामुळे दोन्हीकडे लक्ष देता येत होते..

१९७५ साली दवाखाना सुरू केला, त्या वेळी मुळातच दंतवैद्यांची संख्या फार कमी होती आणि त्यात महिला दंतवैद्य विरळाच! त्यामुळे सुरुवातीपासूनच चांगला प्रतिसाद मिळाला. महिला, लहान मुले आणि साहजिकच त्यांचे कुटुंबीय सुरुवातीपासूनच विश्वासाने येत असत. कित्येक लहान मुले तर आई-वडिलांना न घेता एकेकटे मावशीकडे यावे इतक्या सहजतेने उपचारासाठी येत असत. तेव्हा येणारी मुले आज त्यांच्या मुलांना पेशंट म्हणून घेऊन येतात तेव्हा धन्यता वाटते.

पहिल्यापासूनच वेळेचे बंधन ठेवले होते. घरातच दवाखाना असल्यामुळे ते आवश्यक होते. माझे पेशंटही तितकेच समजूतदार होते. मात्र दात दुखत असल्याची तक्रार घेऊन कोणीही पेशंट कोणत्याही वेळी आला तरी औषध लिहून देत असे, परंतु उपचार मात्र ठराविक वेळेतच!

दवाखाना आणि घर जवळ असल्यामुळे दोन्हीकडे लक्ष पुरवता आले.

मुले मोठी झाल्यानंतर मी म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये आणि ट्रस्टच्या दवाखान्यात जवळजवळ २५ वर्षे मानद दंतवैद्य म्हणूनही काम केले.

पेशंट्सना उपचार करताना काय काय ऑप्शन्स आहेत, त्याचे फायदे तोटे, लागणारा वेळ, त्याचे चार्जेस, याची पूर्ण कल्पना देऊन त्यांच्या संमतीने उपचार करण्याच्या माझ्या सवयीने पेशंटला विश्वास वाटत असे. त्यामुळे एकदा आलेले पेशंट गरज पडली की पुन्हा पुन्हा येत असत, ओळखीच्या इतर लोकांनाही घेऊन येत असत. परिसर सोडून दुसरीकडे गेलेले पेशंटही ट्रीटमेंट साठी येत असत. अशा पेशंटचे अजूनही अपॉइंटमेंट घेण्यासाठी फोन येत असतात.

फक्त पैसा मिळवणे हे ध्येय कधीच नव्हते. स्वतःशी प्रामाणिक राहून व्यवसाय केला की एक प्रकारचे समाधान लाभते हे मी स्वानुभवाने सांगते!

व्यवसाय कोणताही असो, आपल्या क्लायंटचे म्हणणे नीट लक्ष देऊन पूर्णपणे ऐकून घ्या, म्हणजे त्यांचेही समाधान होते आणि आपल्याला त्याच्या समस्येचे आकलन होते. त्यानंतर त्याच्या समस्येवर उपाय सुचवावेत. निवड त्यालाच करू दे. म्हणजे परिणामांची

जबाबदारी ते झटकून टाकू शकत नाहीत. स्वतःशी आणि व्यवसायाशी नेहमीच प्रामाणिक असावे.

मनाशी एखादे ध्येय पहिल्यापासून ठरवलेले असते, परंतु त्याची पूर्तता होतेच असे नाही, काही वेळेला अपयश येते. अशा प्रसंगी निराश न होता, समोर उपलब्ध असलेल्या संधीपैकी जाणकारांच्या मदतीने पर्याय निवडून आपली वाटचाल चालू ठेवावी. यश नक्की मिळेल!

चाळीस वर्षे व्यवसाय करून आता मी क्लिनिक बंद केले आहे. व्यवसायातून निवृत्त झाले आहे. मुले बाहेरगावी आहेत, त्यामुळे बोरिवली येथे आम्ही दोघेच असतो. येथील सामाजिक संस्था, मित्र मंडळी, सांस्कृतिक कार्यक्रम यांत रमतो. वाचनाची आवड पहिल्यापासूनच होती, ती कायम जपली. सध्याही काही मैत्रिणी एकत्र येऊन वाचन मंडळ चालते.

लेखनाचाही छंद जोपासत आहे. देश-विदेशात भरपूर प्रवास केला आहे. प्रवास वर्णन, कथा, कविता, वैचारिक लेख, ललित लेख, व्यक्तिचित्र, स्फुटलेखन असं अनेक प्रकारचं लेखन करते. माझ्या लेखनातील निवडक लेखनाचे 'शब्द सुगंध' या नावाने पुस्तक प्रकाशित केले आहे.

वनिता मंडळ, अमृत कलश, या आकाशवाणी वरील कार्यक्रमांमध्ये मी अभिवाचन केले आहे. सध्या कथाकथन, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत असते! सुजोक, ॲक्युप्रेशर, रेकी, हिप्नॉटिझम, यांचाही अभ्यास केला आहे. गरजेनुसार स्वतःसाठी आणि मित्रमंडळींसाठी या ज्ञानाचा उपयोग करून घेते. लॉकडाऊनपासून आणखी एक उपक्रम केला आहे. व्हॉट्सअप मेमरी एक 'ग्रुप' नवीन उपक्रम सुरू केला आहे. मेंदूला सतत कामात ठेवणे आवश्यक असते, काहीतरी नवीन शिकत राहणे, विस्मरणात गेलेल्या गोष्टी आठवणे, कोडी सोडवणे, अशा अनेक प्रकारे हा मेमरी ग्रुप आपल्या मेंदूला व्यायाम देत असतो. मी स्वतः एका ग्रुपची सदस्य आहे आणि एका ग्रुपची मी लीडर आहे.

अशाप्रकारे यशस्वीपणे व्यवसाय करून आता निवृत्त होऊन कृतार्थ ज्येष्ठत्व समाधानाने व्यतीत करीत आहे.!

***

## विनम्र आवाहन

मे महिन्यात सांगली येथे झालेल्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आपल्या मंडळाने एक स्मरणिका प्रकाशित केली होती. स्मरणिकेच्या 'पर्यटन' या विषयासाठी कुलबंधू-भगिनींकडून लेख मागविले होते. त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला होता. अतिशय चांगले लेख आले होते. हातात पेन घेतलं की आपणाकडून चांगलं काही लिहून होतं याची आम्हाला खात्री होती.

तेव्हा आपल्या वाटचाल या त्रैमासिकासाठीही आपण आपले लेखन साहित्य पाठवावे असे आवाहन या निमित्ताने करीत आहोत.

# आरती सासूबाईंची

जयदेवी जयदेवी जय सासुबाई
तुम्हाला विनविते तुमची सुनबाई

आहार पथ्याचे भान ठेवा हो
व्यायाम झेपेल तेवढाच करा हो
लेकाच्या संसारी आनंद माना
सुनेचे थोडेसे कौतुक करा
जयदेवी जयदेवी .....

दिवस सारा नको अध्यात्मात
राहू दे संवाद थोडा घरात
तुमच्या वेळा तुम्ही सांभाळा
मुलांच्या वेळा तुम्हीही पाळा
जयदेवी जयदेवी ......

लेकाचा बबड्या नका करू हो
सारख त्याचे बोट नका धरू हो
थोडास त्याला मोठा होऊ दे
जबाबदारी ही थोडी घेऊ दे
जयदेवी जयदेवी .....

सून ही तुमची आहे लाडाची
जीवप्राण तिच्या आई-वडिलांची
संसारी आता राबराबते
घराला तुमच्या घरपण देते
जयदेवी जयदेवी .....

नाते मुलाशी तुमचे रक्ताचे
जपा मन थोडे तुम्ही सुनेचे
आजारपणात तीच मदतीस येई
तीच होईल बघा तुमची हो आई
जयदेवी जयदेवी ....

- **चैत्राली जोगळेकर**
(वर्षा श्रीधर देवधर)

# आपण यांना अंतरलो..

* सौ वर्षा मंगेश देवधर, पेण
  जन्म - ०२-०२-१९७९
  मृत्यू - १४-०५-२०२३
  त्या सभासद नव्हत्या

* सौ अंजली अनंत देवधर
  विलेपार्ले (२०१९ पासून सांगली वास्तव्य)
  कुलवृत्तांत पान ८५०
  सभासद क्रमांक ६७९
  जन्म २८/११/१९५७
  मृत्यू १४/११/२०२३

* सौ माणिक सुधीर देवधर
  कोल्हापूर
  सभासद क्रमांक ५८१
  कुलवृत्तांत पृष्ठ क्रमांक ८१०
  जन्म १७/०९/१०४६
  मृत्यू ३०/११/२०२३

* श्रीमती शामला सुधाकर देवधर
  डोंबिवली.
  जन्म - २/१०/१९४२
  निधन - ३०/११/२०२३
  सभासद नव्हत्या.



# वाटचाल वितरण संबंधी निवेदन

नमस्कार मंडळी.

आपलं वाटचाल त्रैमासिक पोस्टाद्वारे पोहोचण्यास बऱ्याचदा खूप उशीर होतो किंवा मिळतच नाही अशा तक्रारी येतात. म्हणून ऑनलाइन पर्यायही उपलब्ध केला आहे. आपल्या व्हाट्सअप च्या सर्व समूहांत ऑनलाईन वाटचाल ही पाठवला जातोच. पण तरीही इतर अनेक पोस्ट्सच्या गर्दीत तो पटकन पाहिला जात नाही. (miss होतो)

ज्या सभासद कुलबांधव आणि भगिनींना फक्त ऑनलाइन च पाठवून हवा असेल त्यांनी खाली दिलेल्या व्हाट्सअप क्रमांकावर व्हाट्सअप मेसेज करावा. अथवा ईमेल आयडीवर इ मेल पाठवावा.

त्या मेसेज मध्ये तुमचं संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी ही संपूर्ण माहिती नमूद करावी. वाटचाल अंक तुमच्या ई-मेल आयडीवर पाठवायचा आहे की व्हाट्सअप क्रमांकावर पाठवायचा आहे ते कृपया स्पष्ट लिहावे. आपण निवडलेला हा पर्याय कायमस्वरुपी असेल, त्यानंतर त्यात शक्यतो बदल करू नये. ह्याची कृपया नोंद घ्यावी. ही नम्र विनंती. धन्यवाद.

-पूर्वा देवधर.

९८६९९३९०७२

येथे फक्त मेसेज पाठवणे, (फोन करू नये)

अथवा

purdeo.77@gmail.com येथे ईमेल पाठवावा

# आर्थिक मदतीसाठी आवाहन

देवधर मंडळाच्या सर्व कुलबंधु-भगिनींना सादर नमस्कार.

देवधर कुलबंधू-भगिनींना अडचणीच्या काळात मदत करणे हे कर्तव्य असल्याची मंडळाची भावना आहे. त्या भावनेपोटी मंडळातील कोणाला आजारपणासाठी मदत लागली, शैक्षणिक मदत लागली अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे अर्थसाहाय्य लागले तर मंडळाच्या ठरलेल्या धोरणांप्रमाणे संबंधीत गरजू कुलबांधवाला अथवा भगिनीला मंडळ अवश्य मदत करते. अर्थात ही मदत मंडळ आपल्या कुलुबंधु-भगिनींकडून आलेल्या आर्थिक मदतीच्या जीवावरच करीत आहे त्यामुळे आपणा सर्वांना पुन्हा एकदा कळकळीचे आवाहन की मंडळाच्या शिक्षण निधी, आरोग्य निधी, आपत्ती निवारण निधी यासाठी मनापासून मदत करा. आपण केलेली मदत आपल्याच एका कुलबंधूच्या आयुष्याची गाडी रुळावर येण्यासाठी उपयोगी पडेल.

देवधर मंडळाच्या सर्वसाधारण सभेत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दरवर्षी प्रत्येक आजीव सभासदाने प्रत्येकी रुपये ३००/- संवर्धन देणगी म्हणून द्यावी अशी विनंती सर्व सभासदांना करण्यात येत आहे. वार्षिक सभा, वाटचाल असे इतर गोष्टींसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल.

देवधर मंडळाचे कार्यकारी मंडळ हे सर्व कुलबंधु-भगिनींचे प्रतिनिधीत्व करते, कारभार सांभाळते. जबाबदारी मात्र आपल्या सर्वांचीच. नाही का?

# कु. श्रुती देवधर हिचे सुयश

देवधरांची सुकन्या श्रुती नाशिकच्या हेमंत देवधर व वर्षा देवधर यांची सुकन्या.



समस्त देवधर, दीक्षित, ढमढेरे आणि कौशिक गोत्री कुळातील सर्वांना अभिमान वाटावा अशी श्रुतीची कामगिरी. अत्यंत लहान वयामध्ये तिने कथक नृत्य विशारद व एम्.ए. कथक नृत्य अशा दोनही पदव्या स्वत:च्या अत्यंत समर्पणाने आणि साधनेने मिळवल्या आहेत.

२६ जानेवारी रोजी दिल्लीमध्ये परेड होते, त्यामध्ये प्रत्येक राज्याचे चित्ररथ सहभागी असतात ह्या वर्षी म्हणजे २०२३ मधे झालेल्या २६ जानेवारी परेड मधे महाराष्ट्राच्या चित्ररथांबरोबर जे नृत्य सादर केलं गेलं त्याच्यामध्ये श्रुतीचा सहभाग होता हे विशेष! ती सुद्धा या अनुभवाबद्दल खूप भरभरून बोलते आणि सांगते की, ''२६ जानेवारीच्या दिल्लीतल्या राजभवनावरील होणाऱ्या परेडमध्ये सहभागी होणं हा आयुष्यातला तिचा अत्युच्च आनंद आहे. त्या सरावासाठी तिला दिल्लीला बोलावलं गेलं. अत्यंत उत्तम सोईसुविधा पुरविल्या गेल्या आणि प्रत्यक्ष प्रेझेंटेशन करताना उर भरून आला''

श्रुतीला सांस्कृतिक मंत्रालयातर्फे आता स्कॉलरशिपही मिळालेली आहे. सध्या श्रुती एका शाळेमध्ये डान्स टीचर म्हणून कार्यरत असून ती स्वतःचे नृत्याचे प्रशिक्षण वर्ग आणि क्लासेस सुद्धा घेते. एवढ्या लहान वयातल्या या श्रुतीने केलेल्या कामगिरीबद्दल देवधर मंडळाच्या कार्यकारणी सदस्य शुभांगी देवधर यांनी तिच्या घरी जाऊन तिचं कौतुक केले आहे आणि तिच्या पुढच्या वाटचालीबद्दल तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

श्रुतीच्या गुरू आहेत नाशिकमधील सुप्रसिद्ध नृत्यांगना रेखा नाडगौडा व अदिती पानसे. त्यांचं उत्तम मार्गदर्शन श्रुतीला लाभले आहे. तिची आता नृत्य अलंकार या परीक्षेच्या दृष्टीने तयारी चालू आहे.

श्रुतीला सगळ्याच देवधर दीक्षित ढमढेरे आणि कौशिक गोत्री कुटुंबीयांकडून खूप मनापासून शुभेच्छा!!

– ***श्रीमती शुभांगी देवधर*** (नाशिक)



## कुलबंधू-भगिनींची अचानक भेट

मंडळाचे कार्यकारिणी सदस्य, समीर, विष्णू आणि अकल्पिता हे आपल्या कुटुंबीयांसह केशवराज दर्शनासाठी गेले होते. त्या वेळी मंदिरात वार्षिक उत्सव सुरू होता. या उत्सवाकरिता आसूद येथे सातारा, सोलापूर अशा विविध ठिकाणांहून मुद्दामहून आलेल्या कुलबंधू-भगिनींशी त्यांची गाठभेट झाली. अचानक झालेल्या या भेटींमुळे सर्वांना खूप आनंद झाला.


Book Packet
Containing periodical
R.N.I. No. : MAHMAR/2000/4869


प्रति,

माननीय


संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.